# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील समस्याग्रस्त असलेल्या दिवा परिसरात विकासकामे करण्यासाठी स्वतंत्र विकास आराखडा करण्याबाबत**

**(१) ६०१ (२३-१२-२०१४). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील समस्याग्रस्त असलेल्या दिवा परिसरात विकासकामे करण्यासाठी स्वतंत्र विकास आराखडा करण्याचा निर्णय मा.आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी दिनांक १३ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास केलेल्या पाहणी दौऱ्यावेळी दिलेला होता, हे खरे आहे काय,

(२) उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही अद्याप पुर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच दिवा परिसरातील हजारो नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०७-२०१६) :** (१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिवा परिसरात रस्त्यांची पाहणी करण्याकरीता आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी दि. १३ नोव्हेंबर, २०१४ व त्यासुमारास पाहणी दौरा केला होता. सदर पाहणी दौरा स्वतंत्र विकास आराखडा तयार करण्याकरीता नव्हता.

(२) व (३) सदर पाहणी दौऱ्यादरम्यान दिवा येथील अनधिकृत बांधकामांमुळे वाढलेली प्रमाणाबाहेरील लोकसंख्या व सदर लोकसंख्येस आणि दिवा स्टेशनशी नजीकच्या गावांचा दळणवळणाचा संपर्क करण्याकरीता आवश्यक रस्त्याचे जाळे विकसीत करणे, त्यास येणारी सागरी किनारा नियंत्रण रेषेमुळे बाधा या विषयावर पाहणी करण्यात आली. सदर भागातील विकास आराखड्यातील रस्ते विकसित करणेकरीता प्राथमिक सर्वेक्षण व जमिनींचे ७/१२ उतारे

मिळवून जमिनधारकांना रस्त्याने बाधित होणारे भूखंड FSI/TDR चे मोबदल्यात महापालिकेचे ताब्यात देण्याबाबत विनंती पत्र देण्याचे काम महानगरपालिकेचे स्तरावर सुरु आहे.

---

**ठाणे परिसरातील मोडकळीस आलेल्या इमारतीसाठी**
**क्लस्टर डेव्हलपमेंट योजना राबविण्याबाबत**

**(२) ६०३ (२३-१२-२०१४). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे परिसरातील मोडकळीस आलेल्या इमारतींमधील लाखो रहिवाशांच्या जिवीताचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असल्याने क्लस्टर डेक्हलपमेंट योजना राबविण्याचा निर्णय माहे जुलै, २०१४ मध्ये घेतलेला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही अद्याप पुर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच ठाणे महापालिका व जिल्हयातील धोकादायक इमारतीमध्ये वास्तव्यास असलेल्या लाखो नागरिकांचे जीव धोक्यात आलेले असल्याने मोडकळीस आलेल्या सर्वच इमारतींचा क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून पुनर्विकास करण्यासाठी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :** (१), (२) व (३) आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी ठाणे शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नागरी नुतनीकरण योजनेचा (Urban Renewal Cluster Development) अंतर्भाव करण्याकरिताचा प्रारुप मसुदा दि. २६/११/२०१३ च्या पत्रान्वये शासनास सादर करुन सदर फेरबदलाकरिता शासन सतरावरुन कलम ३७(१अेअे) ची कार्यवाही करण्याची विनंती शासनास केली होती. तद्नंतर आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी दि. २६/२/२०१४ च्या पत्रान्वये सुधारित मसुदा शासनास सादर केला होता. त्यामध्ये शासनाने आवश्यक ते बदल करुन सदर विनियम मंजूर विकास नियंत्रण नियमालवीमध्ये अंतर्भूत करणेकामी व सदर फेरबदल प्रस्तावावर आम जनतेकडून हरकती/सुचना मागविण्यासाठी कलम ३७(१अेअे) ची सूचना दि. ४/३/२०१४रोजी प्रसिध्द केली आहे. सदर सुचनेवर प्राप्त हरकती/सुचना, नियुक्त अधिकारी यांचा अहवाल व त्यावरील संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे प्राप्त अभिप्राय विचारात घेऊन निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**एम. एम. आर. डी. ए ची हद्द डहाणूपर्यंत वाढविण्याबाबत**

**(३) १९०४ (२३-१२-२०१४). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील बोईसर, डहाणू, पालघर या तालुक्यांमध्ये मोठया प्रमाणात नागरीकीकरण व औद्योगिकीकरण होत आहे तसेच मुंबईतील वाढत्या लोकसंख्येला सदरहू उपविभाग पर्याय ठरत असल्याने झपाटयाने वाढत असलेल्या लोकसंख्येला मूलभूत सोयीसुविधा अत्यंत कमी पडत असल्याने सदरहू उपविभाग मुंबई महानगर विकास प्राधिकरणांतर्गत समाविष्ट करण्यात यावा व एमएमआरडीएची हद्द डहाणू पर्यंत वाढविण्यात यावी अशा आशयाची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्र्यांकडे दिनांक ९ जुलै, २०१२, दिनांक २७ ऑगस्ट,२०१२ व तद्नंतर पुन्हा दिनांक ३० जानेवारी, २०१४ रोजी लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, असल्यास, त्यानुसार एमएमआरडीएची हद्द डहाणूपर्यंत वाढविण्याच्या दष्टीने शासनाची भुमिका काय आहे,

(३)अद्यापी निर्णय घेतला नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१६):** (१) होय, अशा आशयाची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे.

(२) व (३) सदरहू बाब तपासण्यात येत आहे.

---

**महाराष्ट्र नगररचाना अधिनियम, १९६६ अन्वये म.औ.वि.म. च्या**
**विकास नियंत्रण नियमावलीबाबत**

**(४) २६०७ (२३-१२-२०१४).श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये म.औ.वि.म.ची विकास नियंत्रण नियमावली मंजूर केलेली आहे किंवा कसे,

(२) असल्यास, सदरील नियमावलीस शासनाची मंजूरी प्राप्त आहे काय, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरील नगररचना अधिनियम ४ अंतर्गत औद्योगिक क्षेत्रातील विकास आराखडे मंजूर करुन घेणे अभिप्रेत होते किंवा कसे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१६) :**(१) होय.

(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिसूचित क्षेत्रातील जागेच्या विकासासाठी शासनाने अधिसूचना टिपीबी/४३९५/३५३/प्र.क्र.१३५/९५/नवि-११, दिनांक ७/०१/१९९९ अन्वये मूळ

विकास नियंत्रण नियमावलीस मंजूरी दिली होती. सुधारित विकास नियंत्रण नियमावलीला शासनाने अधिसूचना क्र. टिपीबी-४३०८/४६५/प्र.क्र/६४/०८/नवि-११, दिनांक ३१/०८/२००९ नुसार मंजूरी दिली आहे.

(३) व (४) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४ ची तरतूद प्रादेशिक नियोजन मंडळाशी निगडीत आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाशी निगडीत नाही.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४० (१A) तरतूदीनुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिसूचित क्षेत्रासाठी महामंडळ हे विशेष नियोजन प्राधिकरण आहे. महामंडळाच्या कार्यक्षेत्रामधील विकास कामांना मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेकडून मंजूरी दिली जाते.

---

## ठाणे शहरातील मेट्रो रेल्वेला मंजूरी मिळाल्यानंतर ठाणे महानगरपालिकेने कासारवडवली येथील जमिनीवर मेट्रो रेल्वे कारशेड बनविण्यासाठी आरक्षण टाकल्याबाबत

**(५) २९०२ (२३-१२-२०१४). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील मेट्रो रेल्वेला मंजूरी मिळाल्यानंतर ठाणे महानगरपालिकेने कासारवडवली येथील जमिनीवर मेट्रो रेल्वे कारशेड बनविण्यासाठी आरक्षण टाकले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेट्रो रेल्वे कारशेड बनविण्यासाठी पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६)** :(१) ठाणे शराच्या मंजूर विकास योजनेतील शेती विभागात समाविष्ट असलेल्या मौ. ओवळा, येथील सुमारे ४० हे. या जमीनीचा मेट्रो कारशेड ॲण्ड अलाईड फॅसिलिटीज ॲण्ड कमर्शियल असा वापर बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्याची बाब प्रस्तावित आहे.

(२) सदर प्रकरणी छाननी सुरु असुन, त्याविषयी उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.

---

## मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विकास आराखड्यामध्ये महाराष्ट्र शासनाची जागा बाधीत होत असल्याबाबत

**(६) ३१८४ (२३-१२-२०१४). श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर शहरातील महाराष्ट्र शासनाची एकूण किती जागा मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विकास आराखड्याप्रमाणे बाधीत होत आहे,

(२) असल्यास, कोणकोणत्या जागा आरक्षणाखाली बाधीत होत आहेत आणि किती क्षेत्र होत आहे,
(३) आरक्षणाची जागा महापालिकेला ताब्यात देण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय व कधी देण्यात येणार,
(५) आरक्षण बाधीत सरकारी जागा महानगरपालिकेला हस्तांतरण करण्यासंबंधी शासनाची निश्चित भुमिका काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :** (१) मिरा-भाईंदर शहरातील महाराष्ट्र शासनाच्या एकूण २८ जागा विकास आराखड्याप्रमाणे बाधीत होत आहे.
(२) मौजे चौक, उत्तन, राई-मुर्धे, भाईंदर, घोडबंदर, नवघर, खारी येथील शासकीय जमिनी आरक्षणात अंतर्भूत असून त्यांचे एकूण क्षेत्र सुमारे १७१.३३ हे आर. इतके आहे.
(३) व (४) एकूण २८ आरक्षणाखालील जागांपैकी ९ आरक्षणाखालील जागा महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यात आलेल्या आहेत व १८ आरक्षणाखालील जागा अतिक्रमणापासून संरक्षण होणेकरीता महानगरपालिकेकडे सोपविल्या आहेत. तर १ आरक्षणाखालील जागेचा अद्याप निर्णय झालेला नाही.
(५) मंजूर विकास योजनेअंतर्गत शासकीय जमीन असल्यास ती महानगरपालिकेस त्या आरक्षित कारणाकरिता महूसल विभागाकडून नियमानुसार हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करण्यात येते.

---

**शासनाने म्हाडाच्या विरार बोळींज येथील महानगरपालिकेच्या ताब्यात दिलेल्या तसेच म्हाडाच्या लेआऊटमधील महानगरपालिकेकडे हस्तांतरित केलेल्या बगीच्याबाबत**

**(७) ५५५३ (०६-०४-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने म्हाडाच्या विरार बोळींज येथील महानगरपालिकेच्या ताब्यात दिलेल्या तसेच म्हाडाच्या लेआऊटमधील महानगरपालिकेकडे हस्तांतरित केलेला बगीचा १२ मी, रुंदीचा डी.पी.रस्ता व ई.पी १८ नुसार मंजूर केलेल्या क्षेत्रातील ६३२७ चौ.मी.जागा हरित पट्टयाकरिता सोडून स्मशानभूमीचे आरक्षण प्रस्तावित करण्यात आल्यामुळे म्हाडाच्या योजनेवर अन्याय झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विरार येथील म्हाडाला प्राप्त झालेल्या ४७ हेक्टर जमिनीपैकी सुमारे २२ हेक्टर जमिनीवर विकास आराखड्यामध्ये विविध आरक्षणे टाकण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, म्हाडाने सदरहू आरक्षणावर बांधलेल्या घरे योजनेबाबत शासन काय कार्यवाही वा उपाययोजना करणार आहे,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१६)** :(१) महानगरपालिकेने दफनभूमीकरीताचे आरक्षण प्रस्तावित करण्यासाठी कलम ३७ नुसारची कार्यवाही सुरु केली आहे.

(२) म्हाडाला गृहनिर्माण करिता प्राप्त ४७ हेक्टर जमिनीपैकी २०.२५ हेक्टर जमिनीवर विकास योजनेमध्ये विविध आरक्षणे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

(३) वसई-विरार शहर महानगरपालिकेने मंजूर विकास योजना व मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार म्हाडाला विकास परवानगी दिलेली आहे. तसेच प्रस्तावित दफनभूमीपासून ३० मीटरचा हरितपट्टा दर्शवून म्हाडा ने सुधारित बांधकाम परवानगी प्रस्ताव महानगरपालिकेकडे सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण शहरामध्ये अनेक इमारती जुन्या व धोकादायक स्थितीत असल्याबाबत.**

**(८) ६६४९ (०६-०७-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण शहरामध्ये अनेक इमारती जुन्या व धोकादायक स्थितीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्या इमारतीच्या पुन:विकास न झाल्यामुळे इमारत पडून जिवीत व वित्तहानी झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इमारती पुन:विकास करण्याकरीता २.५ (एफ.एस.आय.) व एस.आर.ए. योजना राबविण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, धोकादायक इमारतीच्या पुन:विकासाकरीता शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६)** :(१) होय.

(२) जिवित व वित्त हानी टाळण्याच्या दृष्टीकोनातून महनगरपालिकेकडून संबंधित इमारत मालक, भोगवटाधारक अथवा भाडेकरु यांना कायदेशिर तरतुदीप्रमाणे नोटीस बजाविण्यात येते. जुन्या इमारतींची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्यामुळे प्राधान्याक्रमाने काही अति धोकादायक इमारती निष्कासित केलेल्या आहेत व याबाबतची कार्यवाही निरंतर सुरु आहे.

(३) होय.

(४) कल्याण-डोंबिवली शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नागरी समुह विकासाबाबतची नियमावली, आवश्यक त्या आघात मुल्यांकन अहवालासह समाविष्ट करण्याबाबतचा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ चा परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर केल्यास शासन त्याविषयी उचित निर्णय घेईल, असे शासनाचे

आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना कळविले आहे. मात्र महानगरपालिकेकडून तसा प्रस्ताव अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यानुसार ४० मिटरचा रस्ता (मिसींग लिंक) म्हणून दर्शविण्यात आल्याबाबत**

**(९) ८२२२ (०७-०४-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यानुसार ४० मिटरचा रस्ता (मिसींग लिंक) म्हणून दर्शविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर रस्ता मुंबई महानगरपालिकेच्या पाण्याच्या पाईप लाईन जवळ असून त्यामध्ये साईनाथनगर, गांधीनगर, भीमनगर, जानकीदेवी नगर, इत्यादी झोपडपट्टी येत असून त्या झोपडपट्टीधारकांचे पुन:वसन करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) सदर बाब ही झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व बृहन्मुंबई महानगरपालिकेशी संबंधित असल्याने, या दोहोंमध्ये समन्वय साधून याविषयी उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोअर परळ येथील सेनापती बापट मार्गावरील बेस्ट आगार व विद्युत केंद्रासाठी आरक्षित असलेला भूखंड विकासकाला दिल्याबाबत**

**(१०) ८३९८ (०७-०४-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोअर परळ येथील सेनापती बापट मार्गावरील बेस्ट आगार व विद्युत केंद्रासाठी आरक्षित असलेला भूखंड एका विकासकाला दिला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेस्टचे आरक्षित भूखंड विकासकाला देण्यामागचे उद्देश काय आहे,

(३) असल्यास, बेस्ट आगार व विद्युत केंद्रासाठीचा भूखंड किती चौरस मीटरचा आहे,

(४) असल्यास, भूखंडाच्या मोबदल्यात संबंधित विकासक बेस्टला काय देणार आहे,
(५) असल्यास, सर्वसामान्यांसाठी संबंधीत भूखंडावर घरे बांधली जाणार आहेत काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१६)** :(१), (२) व (३) बेस्ट आगार व विद्युत केंद्रासाठी आरक्षित असलेल्या भूखंडाचे क्षेत्रफळ ८२९६ चौ.मी. असून त्यामध्ये बेस्ट उपक्रमाने बस स्थानक व विद्युत संग्राही केद्रांचे बांधकाम केलेले आहे. सदर भूखंडामध्ये ८९८.७६ चौ.मी. क्षेत्रावर कमलपत्रा चाळ नावाची मुंबई महानगरपालिकेच्या भाडेकरुंची चाळ अस्तित्वात आहे. सदर भाडेकरुंच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेने विकासकामार्फत चाळीचा पुन:विकास प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सादर केलेला असून विनियम ३३(७) खालील तरतूदीनुसार सदर प्रस्तावासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कार्यवाही अभिप्रेत आहे. बेस्ट प्रशासनाने सदर प्रस्तावास नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.
(४), (५) व (६) प्रस्तुत प्रकरणी विकासकाकडून चाळीतील भाडेकरुंचे पुनर्वसन प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे सदर जागा आरक्षित असल्याने विनियम ३३(७) चे तरतुदीनुसार परिगणित होणारे सुविधा क्षेत्र विकासकाने बेस्टला देणे क्रमप्राप्त आहे.

---

### उल्हासनगर शहरातील अनाधिकृत बांधकामे नियमित करणे तसेच त्याच्या दंडाची रक्कम कमी करणे

**(११) ८६१३ (०६-०७-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) शहरातील अनधिकृत बांधकामे नियमाधीन करणेसाठी शासनाने कायदा केला होता, उल्हासनगर शहरातील हजारो नागरिकांनी त्यांची बांधकामे नियमित होणेसाठी महानगरपालिकेच्या तज्ञ समितीचे कामकाज ठप्प पडलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुमारे ४ वर्षापासून एकाही प्रकरणात अंतिम निर्णय झालेला नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रामुख्याने अनाधिकृत बांधकामाची दंडात्मक रक्कम भरुन बांधकाम नियमित करावयाचे आहे, परंतु दंडात्मक रक्कम ही आजच्या प्रचलित दरानुसार लावण्यात येत आहे असे न करता त्यामध्ये ज्यावेळेस बांधकाम झाले आहे त्यावेळेच्या प्रचलित दरानुसार दंड आकारण्यात आल्यास शहरातील सर्व अनाधिकृत बांधकामधारक पुढे येतील व शासनाच्या तिजोरीत भर पडू शकेल, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शहरातील हजारो बांधकामे नियमित होवू शकले नाही, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, तज्ञ समिती अध्यक्ष व जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे प्रलंबित प्रकरणाबाबत कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :**(१) नाही.

(२) नाही.

(३) ते (६) उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधिन करणेसंबंधिच्या प्रलंबित प्रस्तावामध्ये प्रस्तावधारक हे आवश्यक ती कागदपत्रे व माहिती, विकासकामाचा भक्कमपणा प्रमाणपत्र (Structural Stability Certificate) व अग्निशमन सुरक्षा उपाय योजनेबाबत आवश्यक ते प्रमाणपत्र सादर करित नसल्याने, अनधिकृत विकास कामे नियमाधिन करण्यास विलंब होत आहे.

---

**उल्हासनगर शहराच्या हद्दीतील धोकादायक इमारतीतील पुनर्बांधणी करताना चार चटई क्षेत्र निर्देशांक मंजुर होणे व पुनर्बांधणी करताना मुळ मिळकत धारकांची नावे लागणे**

**(१२) ८६१४ (०६-०७-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर शहराच्या महापालिका हद्दीतील धोकादायक इमारतीतील पुनर्बांधणी करताना चार चटई क्षेत्र निर्देशांक मंजुर होणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्लस्टर डेव्हलपमेंट प्लॅन प्रमाणे २.५ चटई क्षेत्र देण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इमारत पुनर्बांधनी करताना मुळ मिळकत धारक व फ्लॅट धारक यांना बांधकाम व्यावसायिक वेगवेगळे धमकी, आमिष अथवा प्रलोभने दाखवून त्यांची मिळकत आपल्या नावावर करुन घेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनस्तरावरुन कोणती उपाययोजना करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१६) :**(१) नाही. उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकास कामे नियमाधिन करणे अधिनियम-२००६ अंतर्गत नियमानुकूल करण्यात आलेल्या बांधकामाच्या पुनर्बांधणी प्रस्तावांना ४.०० चटई क्षेत्र निर्देशाक देण्याची मागणी काही पुनर्विकास प्रस्तावांतर्गत शासनाकडे प्राप्त झाली आहे.

(२) सुधारीत प्रसिध्द प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नागरी समुह विकासाबाबतची तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

(३) उल्हासनगर महानगरपालिकेच्या अभिलेखानुसार अशी बाब निदर्शनास येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरातील जुन्या इमारतीच्या पुन:विकासाचा मार्ग मोकळा करुन क्लस्टर डेव्हलपमेंट धोरणावर शिक्कामोर्तब केल्याबाबत**

**(१३) ९८०७ (०७-०४-२०१५). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील जुन्या इमारतीच्या पुन:विकासाचा मार्ग मोकळा करुन नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये मा.मुख्यमंत्री महोद्यांनी क्लस्टर डेव्हलपमेंट धोरणावर शिक्कामोर्तब केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त क्लस्टर डेव्हलपमेंट धोरणाचा फायदा शहरातील किती जुन्या इमारतीना होणार आहे,

(३) असल्यास, याची अंमलबजावणी केव्हापासून होणार आहे व कोणकोणत्या भागात सदर क्लस्टर डेव्हलपमेंट धोरण राबविण्यात येणार आहे,

(४) असल्यास, क्लस्टर डेव्हलपमेंटच्या धोरणाचे सर्वसाधारण स्वरुप काय असेल ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१५) :**(१) ते (४) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मध्ये जुन्या विनियम, ३३(९) मधील तरतूदीनुसार नागरी नूतनीकरण योजनेमध्ये (क्लस्टर डेव्हलपमेंट) प्रामुख्याने उपकर इमारतींच्या पुनर्विकासाची तरतूद होती.

शासनाने दिनांक ९.९.२०१४ रोजीच्या अधिसूचनेन्वये फेरबदल मंजूर केलेला असून पूर्णत: नवीन विनियम अंतर्भूत केलेला आहे. त्यानुसार ३० वर्षावरील सर्व अधिकृत इमारती नागरी नूतनीकरण योजनेमध्ये पात्र ठरविलेल्या आहेत. उपकर इमारतींबरोबर सर्व प्रकारच्या जुन्या इमारतींना त्याचा फायदा होणार आहे. सदर नियमांची अंमलबजावणी सुरु झालेली आहे.

सर्वसाधारणपणे विनियम ३३(९) च्या तरतुदीनुसार पुनर्विकास इमारतींचा समूह असलेल्या , किमान ४००० चौ.मी. क्षेत्र असलेल्या व १८.०० मी रुंद रस्ता असलेल्या भूखंडामध्ये नागरी नूतनीकरण योजना राबविणेत येते. त्याकरिता ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक किंवा विद्यमान भाडेकरु / भोगवटदार यांच्या पुनर्वसननासाठी लागणारा चटई क्षेत्र निर्देशांक अधिक प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक यामधील कमाल चटई निर्देशांक अनुज्ञेय आहे. अशा भूखंडांचा सार्वजनिक सुविधा क्षेत्राच्या निर्माणासह पुनर्विकास करणेची तरतूद आहे.

---

**मुंबई ताडदेव पट्टे बापूराव मार्गावरील बाळाराम स्ट्रीट येथील बिल्डिंग विकसित करण्याबाबत.**

**(१४) १०५८७ (०७-०४-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ताडदेव पट्टे बापूराव मार्गावरील सर्वे नं.१५३, १५४, १८२ आणि ३ -५ सी ७ - १७ अेबी, ३९अे या बाळाराम स्ट्रीट येथील बिल्डिंग विकसित करण्यासाठी घेतल्या आहेत, तथापि मूळ भाडेकरुंची संख्या ३८९ असता ३०४ एवढे करुन म्हाडा आणि मुंबई महापालिकेने सदर विकासकास परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ८५ भाडेकरुंना वगळण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच सदर प्रकल्पातील सर्व गाळेधारकांना घरे देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१७-०९-२०१६) :**(१), (२), (३) व (४) उपाध्यक्ष, म्हाडा यांचे अहवालानुसार भूकर पाहणी क्र. १५३, १५४, ताडदेव पट्ठे बापूराव मार्ग या नागू सयाजी चाळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गतच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावास मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाद्वारे ना-हरकत प्रमाणपत्र अदा करण्यात आले आहे. ना-हरकत प्रमाणपत्र अदा करताना मंडळाद्वारे ३८९ भाडेकरु/रहिवाशी प्रमाणित केले. तथापि सदर प्रकल्पात बोगस भाडेकरु दाखवून विकासकाने अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक प्राप्त केल्याबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मुंबई इमारत व दरुस्ती व पुनर्रचना मंडळाद्वारे सखोल चौकशीअंती ३०४ भाडेकरु /रहिवाशी प्रमाणित करण्यात आले आहे.

भूकर पाहणी क्र.१५३, १५४ व १८५ ताडदेव विभाग यांचे एकत्रितीकरण करुन विकासकास दि.५.१.२००८ रोजी सुधारित ना-हरकत प्रमाणपत्र अदा केले आहे. भूकर पाहणी क्र.१५३, १५४ वरील पात्र ३०४ भाडेकरु/रहिवाशी व भूकर पाहणी क्र. १८५ वरील पात्र २१२ भाडेकरु/रहिवाशी अशा एकूण ५१६ भाडेकरु रहिवाश्यांचे पुनर्वसन होत नाही तोपर्यंत विकासकास विक्री घटकांच्या विक्रीकरिता मुंबई इमारत व दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाद्वारे ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले जाणार नाही.

---

## पालघर जिल्हयाच्या प्रस्तावित विकास आराखडयातील चुका व त्रुटी नगररचना विभागाच्या वारंवार निदर्शनास येत असल्याबाबत

**(१५) ११२५८ (०७-०४-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.कृष्णा घोडा (पालघर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने नव्याने निर्माण केलेल्या पालघर जिल्हयाच्या प्रस्तावित विकास आराखडयातील चुका व त्रुटया नगररचना विभागाच्या वारंवार निदर्शनास रहिवाश्यांनी आणुन सदर आराखडा रद्द करावा अशी मागणी दिनांक २९/०१/२०१५ रोजी मोर्चा काढून जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगररचना विभागाकडे दिनांक ०८/०१/२०१५ रोजी सादर केलेल्या प्रारुप विकास आराखडयात टेंभाडे, नवली, अत्याळी, वेवूर, घोरवीरा व गोठणपूर भागातील शेतकरी ग्रामस्थांनी घोर फसवणूक झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रारुप आराखडयाला घेण्यात आलेल्या आक्षेपानुसार पुढील कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
(३) व (४) पालघर नगरपरिषद यांच्या वतीने नामनिर्देशित अधिकाऱ्यांने पालघर शहराची प्रारुप विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० अन्वये दि.५/१/२०१५ रोजी शासनाकडे मंजूरीसाठी सादर केली आहे. याबाबत संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय दि.१५/५/२०१५ चे पत्रान्वये शासनाकडे प्राप्त झाले आहेत. त्याविषयी छाननीची कार्यवाही सरु आहे. मा.मुख्यमंत्री महोदयांनी विधानसभेत दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने पालघर विकास योजनेबाबतचे मुद्यांवर चर्चा करणेसाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.२४/६/२०१६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली आहे.

---

### कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ व बदलापूर (जि.ठाणे) व ठाणे शहरातील समस्याची शासनाने दखल घेऊन समूह विकास (क्लस्टर) योजना राबविणे व शहराचा नियोजनबध्द विकास करण्याबाबत

**(१६) ११९८४ (०७-०४-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ व बदलापूर (जि.ठाणे) व ठाणे शहरातील समस्याची शासनाने दखल घेऊन समूह विकास (क्लस्टर) योजना राबविण्याचा व शहराचा नियोजनबध्द विकास करण्याचा निर्णय शासनाने दि. १५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू योजना राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१६) :**(१) आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी ठाणे शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नागरी नुतनीकरण योजनेचा (Urban Renewal Cluster Development) अंतर्भाव करण्याकरिताचे शासनास सादर केलेल्या प्रारुपमध्ये शासनाने आवश्यक ते बदल करुन सदर फेरबदल प्रस्तावावर आम जनतेकडून हरकती/सुचना मागविण्यासाठी कलम ३७ (१अे) ची सुचना शासनाने दि. ४/३/२०१४ रोजी प्रसिध्द केली आहे. सदर सुचनेवर प्राप्त हरकती / सुचना , नियुक्त अधिकारी यांचा अहवाल व त्यावरील संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे प्राप्त अभिप्राय तसेच ठाणे महानगरपालिकेने

सादर केलेला इम्पॅक्ट असेसमेंट रिपोर्ट विचारात घेऊन शासनस्तरावर निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने इम्पॅक्ट असेसमेंट रिपोर्टसहीत समुह विकास योजनेचा प्रस्ताव शासनास सादर केल्यास त्यावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल. असे शासनाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस कळविले आहे. अंबरनाथ व बदलापूर नगरपरिषदांबाबत समुह विकास योजना लागू करण्याची बाब सद्य:स्थितीत शासनस्तरावर विचाराधीन नाही.

(२) ठाणे शहरासाठी समूह विकास योजना अंतीमत: मंजूर करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर योजना अंतीमत: मंजूर झाल्यानंतर योजनेचे स्वरुप स्पष्ट होईल.

(३) ठाणे शहराची समूह विकास योजना अंतीमत: मंजूर झाल्यानंतर त्यानुसार योजना राबविण्यात येईल.

---

### मुंबईच्या विकासाची दिशा निश्चित करणाऱ्या आराखड्याचे प्रारुप तयार करण्याबाबत

**(१७) १४८९४ (०८-०४-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१४ ते २०३४ वर्षाकरीता मुंबईच्या विकासाची दिशा निश्चित करणाऱ्या आराखड्याचे प्रारुप तयार करण्यात आले असून त्यात आठ पर्यंत चटईक्षेत्र वाढवण्याची शिफारस करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगररचना तज्ञ सामाजिक कार्यकर्ते यांनी आक्षेप घेतला असून आठ पर्यंत चटईक्षेत्र वाढवून दिल्यास त्याचा विपरीत परिणाम मुंबईकरांना भोगावा लागणार आहे असा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद् नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१५) :**(१) बृहन्मुंबई महानगरपालकेने दिनांक २५.२.२०१५ रोजी प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेमध्ये सिमित क्षेत्रासाठी आठ चटई क्षेत्र निर्देशांक प्रस्तावित केलेला होता. संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी आठ चटई क्षेत्र निर्देशांक प्रस्तावित केलेला नव्हता.

(२) ते (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २५.२.२०१५ रोजी प्रसिध्द केलेल्या सुधारित प्रारुप विकास योजनेवर विस्तृत प्रमाणात हरकती व सूचना महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या होत्या. सदर प्रारुप विकास योजनेमध्ये आरेखनाच्या चुकांसह इतरही चुका मोठ्या प्रमाणात झालेले निदर्शनास आलेवरुन शासनाने प्रारुप विकास योजनेतील चुकांची सेखाल शहानिशा करुन, त्यानुरुप दुरुस्ती करुन सुधारित प्रारुप विकास योजना पुनप्रसिध्द करणेचे निदेश

दिनांक २३.४.२०१५ रोजी दिलेले आहेत. त्यानुसार नव्याने सुधारित प्रारुप विकास योजना बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २७.५.२०१६ रोजी प्रसीध्द केलेली आहे.

---

**मुंबई उपनगरातील अंधेरी (पश्चिम) ते वांद्रे (पश्चिम)**
**येथील अनेक मार्गावरील पथ दिव्याबाबत**

**(१८) १५३१८ (०७-०४-२०१५). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील अंधेरी (पश्चिम) ते वांद्रे (पश्चिम) येथील अनेक मार्गावरील पथदिव्याच्या कमी प्रकाशामुळे चोरी, महिलांच्या विनयभंगाच्या गुन्हयामध्ये वाढ झाली असल्याचे निवेदन पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-९ यांनी महानगरपालिकेला दिले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षी स्थानिक सिटीझन्स ग्रुपने केलेल्या प्रकाशाच्या पातळीच्या सर्वेनुसार प्रकाशाची पातळी मानांकनापेक्षा ३० टक्के कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आधुनिक दिवाबत्तीचा प्रस्ताव गेल्या एक वर्षापासून महानगरपालिकेच्या कार्यालयामध्ये धुळखात पडला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्ताव महानगरपालिकेच्या तत्कालीन अतिरिक्त आयुक्त श्री.राजीव जलोटा व श्री.ओ.पी.गुप्ता यांच्या खोटया माहितीमुळे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, संपूर्ण मुंबई शहरातील प्रकाशाची पातळी वाढविणा-या आधुनिक दिवाबत्तीच्या प्रस्तावास प्रलंबित ठेवणाऱ्या श्री.राजीव जलोटा व श्री.ओ.पी.गुप्ता या महानगरपालिकेच्या माजी अतिरिक्त आयुक्तांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे काय,

(६) तसेच संपूर्ण मुंबई शहरातील प्रकाशाची पातळी वाढविण्याबाबत शासनास किती कालावधी लागणार आहे तसेच कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे काय,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) सिटीझन्स फोरम या संस्थेमार्फत मुंबईमध्ये १०७ रस्त्यांचे सर्वेक्षण केले असता, अनेक रस्त्यांवर विद्युत दिव्यांची प्रकाश तीव्रता कमी असल्याचे अहवालात दर्शविले होते.

(३) हे खरे नाही.

तथापि, केंद्र शासन अंगिकृत कंपनी मे.एनर्जी ईफिशियन्सी सर्विस लि. (ईईएसएल) यांच्याकडून तसेच शासनाच्या निर्देशाप्रमाणे, बृहन्मुंबईतील सर्व रस्त्यांवरील दिवाबत्तीच्या खांबांवर पारंपारिक दिव्यांऐवजी एलईडी दिवे बसविण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेस प्राप्त झाला होता व त्या अनुषंगाने मरिन ड्राईव्ह येथे प्रायोगिक तत्वावर एलईडी पथदिवे बसविण्यात आले आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) केंद्र शासन व राज्य शासन यांच्या नवीन धोरणात्मक निर्णयाप्रमाणे, बृहन्मुंबईतील सर्व रस्त्यांवरील दिवाबत्तींच्या खांबांवर पारंपारिक दिव्यांऐवजी एलईडी दिवे टप्प्याटप्प्याने बसविण्यात येणार आहेत. त्यामुळे मुंबई शहरातील प्रकाशाची पातळी वाढण्यास मदत होईल.

त्यासाठी प्रशासकीय धोरणानुसार, विद्युत पुरवठा कंपन्यांनी एलईडी दिवे बसविण्यासाठी निविदा मागवावयाच्या आहेत. त्यानुसार मे. बेस्टकडून निविदा मागविण्यात आल्या आहेत. तसेच, मे.रिलायन्स व मे.एमएसईडीसीएल यांच्याकडून देखील अशाप्रकारच्या निविदा मागवावयाच्या आहेत, ज्यामध्ये संबंधित विभाग कार्यालयांकडून विभागनिहाय १०% पारंपारिक सोडियम व्हेपर दिवे बदलून त्याजागी एलईडी दिवे प्रायोगिक तत्वावर बसवावयाचे आहेत.

तद्‌नंतर सदर एलईडी दिवे बसविण्याची प्रक्रिया सर्वसमावेशक भाडे तत्वावर रुपांतरीत करुन व त्याचा योग्य दर ठरवून प्रशासकीय व महानगरपालिका अधिनियम १८८८ नुसार सदर प्रस्ताव स्थायी समिती, सुधार समिती व महानगरपालिका सभागृह यांच्या मंजुरीकरिता सादर करण्यात येईल. सदर प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाल्यानंतर महापालिकेमार्फत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका येथील क्लस्टर योजनेबाबत**

**(१९) १५८६३ (०८-०४-२०१५). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डोंबिवली, जि.ठाणे येथील जाहीर कार्यक्रमात कल्याण-डोंबिवली शहराकरीता दिनांक १ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांनी क्लस्टर डेव्हलपमेंट योजना लागू करण्याचे जाहीर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेला विरोध होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुख्यमंत्र्यांनी जाहिर केलेल्या क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :**(१) कल्याण-डोंबिवली शहराकरीता क्लस्टर डेव्हलपमेंट योजना राबविण्याची विनंती मा.लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक ८/१२/२०१४ च्या पत्रान्वये केली आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने इम्पॅक्ट असेसमेंट रिपोर्टसह समुह विकास योजनेचा प्रस्ताव शासनास सादर केल्यास त्यावर उचित निर्णय घेण्यात येईल. असे शासनाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस कळविले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या हिस्यापोटी शासनाकडून जमा करण्यात येणाऱ्या रक्कमेबाबत

**(२०) १६१४३ (०८-०४-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या हिश्श्यापोटी शासनाकडून जमा करण्यात येणाऱ्या कराची माहे डिसेंबर, २०१४ अखेरपर्यंत २,७३९.८८ कोटीची रक्कम महानगरपालिकेला येणे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या थकबाकीसाठी महानगरपालिकेने अनेकदा शासनाकडे पाठपुरावा केला असतानाही अदयापी ही रक्कम महानगरपालिकेला दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रक्कम महानगरपालिकेला न देण्याची कारणे काय आहेत, त्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०८-२०१६) :**(१) शासनाच्या विविध विभाग/ उपक्रमांकाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस सहाय्यक अनुदाने, मालमत्ता कर, पाणीपट्टी जल व मलनि:सारण आकार तसेच महापालिकेमार्फत शसनाच्या वतीने जमा करण्यात आलेल्या विविध करावरील वटावाच्या रकमांपोटी माहे डिसेंबर, २०१४ पर्यंत रु. ३००३.७६ कोटी इतकी रक्कम येणे असून रु. ३७९.९० कोटी इतकी रक्कम महानगरपालिकेने शासनास देणे आहे.

(२) शासनाकडून महानगरपालिकेस येणे व महानगरपालिकेकडून शासनास देणे ही सातत्याने चालणारी प्रक्रिया असून, थकीत रकमा प्राप्त करण्याकरिता महानगरपालिकेमार्फत पाठपुरावा करण्यात येत असतो.

(३) व (४) शासनाच्या विविध विभागांकडे, विभागांच्या अखत्यारीतील कार्यालयांकडे बृहन्मुंबई महानगरपालिकेची काही रक्कम येणे असते, त्याप्रमाणे शासनास सुध्दा महापालिकेकडून काही रक्कम येणे असते.

सदर रकमांचा भरणा करण्याची प्रक्रिया ही सातत्याने चालणारी आहे.

तथापि, काही थकीत रकमांच्या परिगणनाबाबत शासनाचे व महानगपालिकेचे अधिकारी यांच्यात एकमत होत नसेल तर अशा रकमांचे वाद सोडविण्यासाठी व त्यास अनुसरुन उचित शिफारस करण्यासाठी दि.२५.०१.२०१२ च्या शासन निर्णयान्वये, प्रधान सचिव -२ (नगर विकास), प्रधान सचिव (वित्त) व संबंधित मंत्रालयीन विभागाचे सचिव यांची समिती नेमलेली आहे.

सदर समितीची बैठक दि.३१.०१.२०१३ रोजी व रोजी झाली असून, संबंधित विभागांना महापालिकेच्या रकमा अदा करण्याचे तसेच महापालिकेसही शासनाच्या रकमा अदा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

---

**मुंबईतील १४५ एफ, शिंदे चाळ, साने गुरुजी मार्ग, मुंबई या इमारतीच्या पुनर्बांधणी योजने अंतर्गत भूसंपादनाचा प्रस्ताव**

**(२१) १६१८८ (०८-०४-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील १४५ एफ, शिंदे चाळ, साने गुरुजी मार्ग, मुंबई - १३ या इमारतीच्या पुनर्बांधणी योजने अंतर्गत भूसंपादनाचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेकडून मंजूर होऊन मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावावर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावावर किती कालावधीत कार्यवाही होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०८-२०१६) :**(१), (२) व (३) इमारत क्रमांक १४५ एफ शिंदे चाळ, साने गुरुजी मार्ग व त्यालगतच्या इमारती रेल्वेलगत असल्याने त्या इमारतींच्या पुनर्बांधणी योजनेस मार्यादा आली आहे. त्याखेरीज सदर योजना ना.म.जोशी मार्गाच्या रुंदीकरणामुळे देखील बाधित झालेली आहे. सदर योजना व्यवहार्य होण्याच्या दृष्टीने लगतच्या करमणुकीच्या मैदानाच्या आरक्षण बदलाचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे नगरविकास विभागास सादर केला असून प्रस्तावास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या ३७ (२) नुसार शासनाची मंजूरी वैधानिक कार्यवाहीची पूर्तता बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून झालेली नसल्यामुळे प्रलंबित आहे. आरक्षण बदलास मंजूरी प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाद्वारे त्या मालमत्तेच्या भूसंपदनाचा प्रस्ताव गृहनिर्माण विभागास प्रशासकीय कार्यवाहीस्तव सादर करणे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहर हे भुकंपप्रवण क्षेत्र तीनमध्ये मोडत असल्यामुळे ६.९ रिश्टर स्केल पर्यंत भुकंपाचा हादरा बसण्याचा धोका असल्याबाबत**

**(२२) १७३८५ (११-०८-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर हे भुकंपप्रवण क्षेत्र तीनमध्ये मोडत असल्यामुळे ६.९ रिश्टर स्केल पर्यंत भुकंपाचा हादरा बसण्याचा धोका असताना पालिकेच्या बांधकाम परवानगी नियमावलीकडे दुर्लक्ष झाले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नव्या इमारतींना परवानगी देताना ती इमारत भुकंपात तग धरु शकते का याचे प्रमाणपत्र बंधनकारक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१५)** :(१) अशी बाब नाही.

(२) व (३) मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र. १११५०/२०१३ मध्ये दिनांक १७/१२/२०१३ रोजी आदेश देवून मुंबईतील उंच इमारतीच्या प्रस्तावाची छाननी करणेसाठी श्री.पी.एस.पाटणकर, निवृत्त न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय यांचे अध्यक्षतेखाली तज्ञ समिती गठीत केलेली आहे. सदर समिती दिनांक ९/६/२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यरत झालेली आहे. त्यामध्ये स्थापत्य अभियांत्रिकी विभाग, आय.आय.टी. मुंबई येथील प्राध्यापक तसेच व्हिजेटीआय, मुंबई येथील संरचनात्मक अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक, निरी या संस्थेचे शास्त्रज्ञ, श्री.पंकज जोशी, वास्तुविशारद या तज्ञ व्यक्तींचा समावेश आहे.

सदर समितीकडून प्रामुख्याने ७० मी. पेक्षा जास्त उंच असलेल्या इमारतींच्या प्रस्तावाची छाननी करणेत येत आहे.

उत्तुंग इमारतीची संरचना संकल्पचित्रे ही BIS (IS:१८९३(Part-१)२००२) च्या भूकंपरोधक तरतूदीनुसार (Sesmic Zone-III) तपासली जातात त्यामुळे भविष्यात ह्या इमारती मुंबईतील भूकंपाचे धक्के सहन करु शकतील.

---

**यंत्रमाग कामगारांसाठी किमान वेतन देण्याबाबत**

**(२३) १८४७८ (२१-०८-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी, २०१५ रोजी यंत्रमाग कामगारांसाठी किमान वेतनाची घोषणा करुन अद्याप सदर प्रकरणी कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) राज्यात सुमारे ११ लाख यंत्र कामगार असून उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर सरकारने काढलेल्या किमान वेतन देण्याच्या अधिसूचनेनुसार किमान वेतन देण्याची मागणी यंत्रमाग मालकांनी दिनांक २१ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास फेटाळल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामगारांना मालक ८ तासांऐवजी १२ तास राबवून घेत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तसेच चौकशीनुसार संबंधित यंत्रमाग उद्योजकांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, यंत्रमाग कामगारांना आतापर्यंत किमान वेतन देण्यात आले आहे काय,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२१-०७-२०१६)** :(१) हे खरे नाही. शासनाने किमान वेतनाची अधिसूचना निर्गमित केली आहे.

(२) हे खरे नाही.
(३), (४), (५) व (६) यंत्रमाग कामगारांना टाईमरेट ऐवजी पीस रेट प्रमाणे वेतन दिले जाते. विशेष अंमलबाजवणी पथकाद्वारे चौकशी करुन नियमांचा भंग करणाऱ्या आस्थापनांविरुध्द खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच दंडात्मक कारवाई करुन काही खटले मागे घेतले आहेत. इतर खटले न्यायप्रविष्ट आहेत.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर शहरातील महानगरपालिका हद्दीतील धोकादायक इमारती**

**(२४) १८९८६ (११-०८-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर शहरातील महानगरपालिका हद्दीतील धोकादायक इमारतीतील पुर्नबांधणी करताना चार चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर होणेकामी शासनाकडे प्रस्ताव प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, क्लस्टर डेव्हलपमेंट प्लॅनप्रमाणे २.५ चटई क्षेत्र देण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, इमारत पुनर्बांधणी करताना मूळ मिळकतधारक व प्लॅटधारक यांना बांधकाम व्यावसायिक वेगवेगळे धमकी व आमिष दाखवून त्यांची मिळकत नावावर करुन घेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :**(१) नाही. उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकास कामे नियमाधिन करणे अधिनियम, २००६ अंतर्गत नियमानुकूल करण्यात आलेल्या बांधकामाच्या पुनर्बांधणी प्रस्तावांना ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक देण्याची मागणी काही पुनर्विकास प्रस्तावांतर्गत शासनाकडे प्राप्त झाली आहे.
(२) सुधारीत प्रसिध्द प्रारुप विकास नियंत्रण नियमालवीमध्ये नागरी समुह विकासाबाबतची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.
(३) उल्हासनगर महानगरपालिकेच्या अभिलेखानुसार अशी बाब निदर्शनास येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर शहराचा विकास आराखडा तयार करण्याबाबत**

**(२५) १९००६ (१०-०८-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिकेत उल्हासनगर शहराचा विकास आराखडा तयार करण्याचे काम अहमदाबाद येथील सी.ई.पी.टी. युनिवर्सिटीला दिनांक १७ जुलै, २००९ रोजी तयार करण्याकरीता दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विकास आराखड्यात बऱ्याच चुका झालेल्या असुन सुमारे ३० हजार नागरिकांनी यावर हरकती नोंदविल्या असुन हा विकास आराखडा रद्द करण्याची मागणी येथील लोकप्रतिनिधींनी व नागरीकांनी मा.मुख्यमंत्री तसेच नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडे दिनांक २९ एप्रिल, २०१५ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली व करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :**(१) उल्हासनगर शहराची विकास योजना तयार करण्याचे काम सी.ई.पी.टी. युनिवर्सिटीला दिनांक १८/२/२०१० रोजी देण्यात आले आहे.
(२) व (३) सदर प्रारुप विकास योजनेवर एकूण १७०३३ हरकती सुचना प्राप्त झाल्या असून त्यावरील नियोजन समितीचा अहवाल विचरात घेऊन उल्हासनगर महानगरपालिकेने प्रारुप विकास योजना शासनास अधिनियमातील कलम ३० अन्वये मंजूरीकरिता सादर केली आहे. त्यावर संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा अहवाल शासनास प्रापत झाला आहे. सदर प्रारुप विकास योजनेसंदर्भात प्राप्त हरकती / सुचना / निवेदने यांचा सारासार विचार करुन निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.

---

**ठाणे महानगरपालिका हद्दीतील अधिकृत इमारतीबाबत**

**(२६) १९९२० (११-०८-२०१५). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील ३० वर्षांच्या अधिकृत इमारती पुनर्विकासाला पात्र ठरवून या इमारतींकरिता वाढीव एफएसआय मंजूर करावा यासाठी ठाणे महानगरपालिका शहर विकास विभागाने शासनाकडे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिका क्षेत्रामध्ये ३० वर्षे वयोमान असलेल्या किती इमारती आहेत व सदर प्रस्तावावर शासनाने मंजुरी देण्यात आली आहे वा देण्यात येणार आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१६) :**(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील ३० वर्षाच्या अधिकृत इमारती धोकादायक घोषित झाल्यास त्यांचे पुनर्विकासासाठी वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करणेबाबतचा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ चा प्रस्ताव, ठाणे महानगरपालिकेने शासनाच्या मान्यतेसाठी दि.२०/०८/२०१५ च्या पत्रान्वये सादर केला आहे.

(२) नियोजन प्रभाग क्र ९, १० व ११ (मुंब्रा, कौसा व दिवा) वगळता, उर्वरित भागामध्ये ३० वर्षे वयोमान असलेल्या सुमारे १०६१ अधिकृत इमारती असलचे प्राथमिक सर्वेक्षणात ज्ञात झालेले आहे. ठाणे महानगरपालिकेने शासनास दि.२०/८/२०१५ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावावर उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे, कळवा, मुंब्रा इत्यादी शहरातील बेकायदा इमारतींना क्लस्टर योजनेत सामावून घेण्याबाबत**

**(२७) २११७६ (११-०८-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे, कळवा, मुंब्रा इत्यादी शहरातील मार्च, २०१४ पर्यंतच्या सर्वच बेकायदा इमारतींना क्लस्टर योजनेमध्ये सामावून घेण्यासंबंधीचा नविन प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेने शासनाच्या मंजुरीसाठी सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत शासन स्तरावरुन निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :**(१), (२) व (३) नाही. तथापि, आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी ठाणे शहराच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नागरी नुतनीकरण योजनेचा (Urban Renewal Cluster Development) अंतर्भाव करण्याकरिताचा प्रारुप मसुदा दि.२६/११/२०१३ च्या पत्रान्वये शासनास सादर करुन सदर फेरबदलाकरिता शासन स्तरावरुन कलम ३७(१अेअे) ची कार्यवाही करण्याची विनंती शासनास केली होती. तद् नंतर आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी दि.२६/२/२०१४ च्या पत्रान्वये सुधारित मसुदा शासनास सादर केला होता. त्यामध्ये शासनाने आवश्यक ते बदल करुन सादर विनियम मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अंतर्भूत करणेकामी व सदर फेरबदल प्रस्तावावर आम जनतेकडून हरकती/ सुचना मागविण्याचे कलम ३७(१अेअे) ची सुचना शासनाने दि.४/३/२०१४ रोजी प्रसिध्द केली आहे. सदर सुचनेवर प्राप्त हरकती/ सुचना, नियुक्त अधिकारी यांचा अहवाल व त्यावरील संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे प्राप्त अभिप्राय विचारात घेऊन निर्णय घेण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

---

**चिपळूण नगरपरिषदेंतर्गत होत असलेली अनधिकृत बांधकामे**

**(२८) २३५६० (११-०८-२०१५). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण नगर परिषद (जि.रत्नागिरी) अंतर्गत मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकामे होत असल्याबाबत सन २०१४ ते २०१५ मध्ये मुख्याधिकारी, चिपळूण नगरपरिषद यांच्याकडे अनेक तक्रारी स्थानिक नागरिकांनी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिपळूण शहरातील गोवळकोट परिसरात सीटी सर्वे नं. १७६ व अन्य ठिकाणी अनधिकृत बांधकामे झाली असल्याबाबत नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना तपासणीमध्ये दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनधिकृत बांधकामे पाडण्याबाबत शासनाकडून कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत मार्च, २०१५ मध्ये नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडून केलेल्या कारवाईचा अहवाल मुख्याधिकारी, नगरपरिषद, चिपळूण यांच्याकडे मागविला, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली आहे, संबंधित दोषी अधिकारी व अनधिकृत कामे करणाऱ्या व्यक्तींबद्दल शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
अनेक तक्रारी नसून काही प्रकरणामध्ये स्थानिक नागरिकांनी तक्रारी केलया होत्या. त्या तक्रांरीवर तत्कालीन मुख्याधिकारी यांनी नियमानुसार योग्य ती कार्यवाही केलेली आहे.
(२) व (३) अनधिकृत बांधकामाबाबत संबंधितांना नोटीस देण्यात आल्या असून याबाबत नगरपरिषदेकडून नगररचनाकार, रत्नागिरी यांचेकडून खातरजमा करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) व (५) याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडून अहवाल मागविण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) परिसराचा नियोजनबध्द विकास होण्याबाबत**

**(२९) २४१८० (१०-०८-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) परिसराचा नियोजनबध्द विकास होण्याकरिता त्याठिकाणी नगरपंचायतीच्या जागी सात गावांची नगरपालिका होण्याकरीता २००८ मध्ये ठाणे जिल्हाधिका-यांमार्फत शासनाला प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत ७ वर्षे होऊनही अद्यापी कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०८-२०१६)** :(१) शहापूर नगरपंचायत स्थापन करण्याबाबतची अंतिम अधिसूचना दि. ११ मार्च, २०१५ रोजीच्या शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. नगरपालिका निर्माण करण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या तरतुदीनुसार प्राप्त करुन घेण्यात येत आहे.
(२), (३) व (४) शहापूर नगरपंचायत स्थापन करण्यात आली असून नगरपालिका स्थापनेबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

---

**एमएमआरडीए क्षेत्रात नियोजन प्राधिकरणाचा संयुक्त विकास आराखडा व विकास नियंत्रण नियमावली सामाईक करण्याबाबत**

**(३०) २८७३३ (२१-०१-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एमएमआरडीए क्षेत्रात नियोजन प्राधिकरणाचा संयुक्त विकास आराखडा व विकास नियंत्रण नियमावली सामाईक करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे, मुंबई परिसरातील धोकादायक इमारतींचा प्रश्न सोडविण्यासाठी इमारतींचा एकत्रीत पुनर्विकास योजना (क्लस्टर डेव्हलपमेन्ट) लागू होण्यास नियोजन प्राधिकरणाचा संयुक्त विकास आराखडा व विकास नियंत्रण नियमावली सामाईक विकास योजना लागू व्हावी यासाठी शासनाच्या विचाराधीन असलेल्या सदर प्रस्तावावर निर्णय घेण्यास किती कालावधी लागणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६)** :(१) व (२) होय, बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून मुंबई महानगर प्रदेशातील सर्व महानगरपालिका/नगरपरिषदांसाठी सर्व समावेशक व एकात्मिक विकास नियंत्रण नियमावली तयार करण्यासाठी शासनाने दि. २०/११/२०१२ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत केली होती. सदर समितीने त्यांचा अहवाल शासनास दि. ३०/१०/२०१५ रोजी सादर केला असून, त्यावरील संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत. सदर प्रकरणी कार्यवाही सुरु असून त्यावर लवकर निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोंबिवली नजीकच्या खोणी व अंतर्ली गावाच्या (जि. ठाणे) सुमारे १४१ हेक्टर जागेवरील लोढा बिल्डर्सच्या पालवा गृहनिर्माण प्रकल्पाला नियमबाह्य दिलेल्या सवलतीबाबत**

**(३१) २८८०५ (२१-०१-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली नजीकच्या खोणी व अंतर्ली गावाच्या (जि.ठाणे) सुमारे १४१ हेक्टर जागेवरील लोढा बिल्डर्सच्या पालवा गृहनिर्माण प्रकल्पाला आघाडी शासनाच्या काळात नियमबाह्य दिलेल्या सवलती मा. मुख्यमंत्री यांनी रद्द केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालवा वसाहत प्रकल्पाला प्रिमियम चटईक्षेत्र निर्देशांक (एफएसआय) व अन्य सवलती नियमबाह्य असल्याबाबत नगरविकास विभागाचे सचिव यांनी प्रस्ताव व अहवाल मा. मुख्यमंत्री यांच्याकडे पाठवून त्या रद्द करण्यात याव्यात असा अभिप्रायही दिला आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, लोढा बिल्डर्सच्या 'पालवा' प्रकल्पाबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आल्यानंतर त्याच्या छाननीनंतरची कागदपत्रे गहाळ झाल्याचेही निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,या सर्व प्रकरणी शासन लाचलुचपत प्रतिबंधक खात्यामार्फत चौकशी करणार आहे काय वा चौकशीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :**(१), (२) व (३) नगर रचना संचालनालयाअंतर्गत कोकण विभागाच्या तत्कालीन सहसंचालक यांनी सदर प्रस्तावासाठी लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदींच्या ग्राह्य धरलेल्या अर्थबोधनाच्या (interpretation) अनुषंगाने जिल्हाधिकारी यांना परवानगी मंजूर करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार शिफारशीसाठी मंजूर प्रदान केलेले छाननी अहवाल अभिलेखात उपलब्ध नसल्याने काही बाबींवर सुधारित प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाचे मार्दश्रन अपेक्षिले असता. शासनाने दि. १४/८/२०१५ च्या पत्रान्वये मार्गदर्शनवर निदेश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर महानगरपालिकेतील शाळांमधील शिक्षकांचे वेतन अनियमित होत असल्याबाबत**

**(३२) २८९८७ (२१-०१-२०१६). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महानगरपालिकेतील शाळांमधील शिक्षकांचे वेतन अनियमित होत असल्याचे निदर्शनास आले आहे. हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर प्रकरणी माहिती घेतली असता बिले सादर करणे व मंजूर करणेबाबत शिक्षण उपसंचालक व शिक्षण मंडळ सोलापूर यांच्यात समन्वय नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षकांचे वेतन नियमित करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
प्राथमिक शिक्षण मंडळामधील महानगरपालिका शाळेतील शिक्षकांचा पगार ५०% राज्य व ५०% सोलापूर महानगरपालिका यांच्या अनुदानातून करण्यात येतो. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांच्याकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर शिक्षकांना वेतन अदा करण्यात येते.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरात प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत**

**(३३) २९०५३ (२१-०१-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरात महापालिकेचा कारभार नगरपालिका असताना जी इमारत होती त्याच इमारतीत चालू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामगारांची संख्या हजारांवर असून काम करण्यास कर्मचाऱ्यांना अनेक अडचणी निर्माण होत आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ठिकाणी नवीन प्रशासकीय इमारत होणेविषयी प्रस्ताव मंजूर झाला आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) कोल्हापूर महानगरपालिकेच्या, सुभाष स्टोअर या ठिकाणी मुख्य प्रशासकीय इमारत बांधणे कामी स्पर्धात्मक आराखडे मागविणेत आलेले होते. परंतु सदरची जागा भविष्यात अपुरी पडणार असलेचे निदर्शनास आलेने, निर्माण चौक (मैलखड्डा) येथे नविन प्रशासकीय इमारत प्रस्तावित करणेचे नियोजन आहे.

सदर प्रकल्प कामी शासनाकडून अनुदान मिळणेबाबत कोणताही पत्रव्यवहार करणेत आलेला नाही.

सदरच्या प्रकल्प हा महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असणाऱ्या जागा, व्यापारी (पी.पी.पी.) तत्वावर विकसीत करुन त्यामधून प्राप्त होणाऱ्या प्रिमियमच्या निधीतून विकसीत करावयाचे नियोजन आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर महापालिकेने केएमटीच्या कर्मचा-यांचे पगार थकविल्याबाबत**

**(३४) २९३८६ (२१-०१-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महापालिकेने केएमटीच्या कर्मचा-यांचे गत दोन महिन्याचे पगार थकविल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करुन त्यांचे प्रलंबित पगार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१६) :**(१) के.एम.टी. उपक्रमाकडील कर्मचाऱ्यांचे माहे ऑगस्ट, २०१५ चे वेतन यापुर्वीच अदा करणेत आले आहे, सध्या माहे मे, २०१६ या महिन्याचे वेतन अदा करणेत आलेले नाही.
(२) व (३) प्रलंबित पगार देणेबाबत महानगरपालिकेने उत्पन्न व खर्चाचे नियोजन केले आहे. तथापि, मेळ बसविणे अशक्य असल्याने सहावा वेतन आयोग लागू करण्यात आलेला नाही.

---

**गतीमंद, कर्णबधीर, अस्थीव्यंग, अंध विद्यार्थ्यांच्या शाळांना भूखंड आरक्षित करण्याबाबत**

**(३५) २९६३८ (२१-०१-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गतीमंद, कर्णबधीर, अस्थीव्यंग, अंध विद्यार्थ्यांच्या शाळा निवडक ठिकाणी असल्याने शाळेत जाताना त्यांना व त्यांच्या पालकांना रोज संघर्ष करावा लागत असल्याने अशा विद्यार्थ्यांच्या शाळांसाठी भूखंड आरक्षित करण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने घेतल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१६) :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने म.प्रा. व न.र. अधिनियमाचे कलम २६ अन्वये दि.२७/०५/२०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या पुनर्रचित प्रारुप विकास आराखड्यात अशा प्रकारच्या विशिष्ट दृष्ट्या सक्षम विद्यार्थ्यांसाठी “विशेष शाळा” या उद्दिष्टांसाठी दोन भूखंड आरक्षित ठेवण्यात आले आहेत. तसेच प्रारुप विकास नियंत्रण नियमावली (मे, २०१६) मधील भाग-३ मध्ये तक्ता क्र. ५ मधील अनु क्र. ३ मध्ये या आरक्षणाखाली भूखंड विकसित करण्याची पध्दती विशद केली आहे. यानुसार अशा आरक्षणाखालील विशिष्टदृष्ट्या सक्षम विद्यार्थ्यांसाठी संस्था, वसतीगृह किंवा इतर शैक्षणिक

उद्दिष्ट्ये, सभागृह, विशेष देखरेखीची आवश्यकता असलेल्या मुलांसाठी इतर सुविधा जशा मऊ खेळाचे क्षेत्र, संवेदक खोल्या, विशेष स्थितीतील मुलांच्या उपचारासाठी आवश्यक जलतरण तलाव इ. हे वापर अनुज्ञेय आहेत. तसेच इतर बिगर शैक्षणिक सुसंगत वापर जसे बँकेची शाखा, स्टेशनरी दुकाने, दवाखाने, उपहार केंद्र इत्यादी सहाय्यभूत वापर करता येतील.

तसेच प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीमध्ये विशिष्ट दृष्ट्या सक्षम व्यक्तींसाठी विशेष नियमावली भाग-८ मध्ये अंतर्भूत करण्यात आलेली आहे.

सदर आराखडा हा अंतिम आराखडा नसून म.प्रा. व न.र. अधिनियमाचे कलम २६ अन्वये दि.२७/०५/२०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेसंबंधी हरकती /सूचना मागविण्यात आल्या असून प्राप्त होणाऱ्या हरकत /सूचना पत्रांवर संबंधितांना कलम २८(२) अन्वये गठीत नियोजन समितीमार्फत सुनावणी देण्यात येणार आहे. अधिनियमाचे तरतुदीनुसार पुढील वैधानिक कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

---

**दिघा (नवी मुंबई) परिसरातील अनधिकृत बांधकामावरील कारवाईस स्थगिती मिळणेबाबत**

**(३६) ३०३८१ (२१-०१-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई विभागात सिडको, नवी मुंबई महापालिका व एम. आय.डी.सी. या तिन्ही प्राधिकरणाच्या जागेवर विकासकांनी अनधिकृत इमारती उभ्या करुन त्यातील सदनिका गोरगरीबांना विकल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये या अनधिकृत इमारती पाडण्याची कारवाई एम.आय.डी.सी ने सुरु केल्यामुळे हजारो गोरगरीब बेघर होऊन त्यांचे संसार उघडयावर पडले असल्याने नवी मुंबईतील अनधिकृत बांधकामाबाबत शासन धोरण आखत असून त्याचा आराखडा न्यायालयास सादर करणार असल्याचे शासनाने न्यायालयात स्पष्ट केले आहे त्यामुळे धोरण निश्चित होईपर्यत अनधिकृत बांधकामावरील कारवाई स्थगित करण्यात यावी अशी विनंती मा. उच्च न्यायालयास करावी असे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री महोदयांना माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नविन धोरण आराखडा मा. उच्च न्यायालयात सादर करुन अनाधिकृत इमारतीवरील कारवाई थांबविण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) नागरी भागातील अनधिकृत बांधकामे नियमानुकूल करणेसाठी शासनाने धोरण तयार करुन सदर धोरण मा.मंत्रीमंडळाच्या मंजूरीनंतर शासनाने मा.उच्च न्यायालयात दि ४/४/२०१६ रोजी सादर केले होते. मा.उच्च न्यायालयाने दि. २७/४/२०१६ रोजीच्या आदेशान्वये शासनाने तयार केलेल्या अनधिकृत इमारती नियमित करण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यास अनुमती नाकारली आहे. मात्र शासनाच्या वतीने नवीन धोरण सादर करण्यास मुभा दिली आहे. त्यानुसार नवीन धोरण ठरविण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरातील झोपडपट्टीधारकांना प्रॉपटी कार्ड मिळणेबाबत**

**(३७) ३०६४७ (२१-०१-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरातील झोपडपट्टीधारकांना प्रॉपटी कार्ड मिळावे व सोयीसुविधा पुरविण्यात याव्यात या मागणीसाठी महापालिकेसमोर माहे ऑगस्ट, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात एका राजकीय पक्षाच्यावतीने ठिय्या आंदोलन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीनुसार कोल्हापूर शहरातील झोपडपट्टीधारकांना प्रॉपर्टी कार्ड आणि सोयीसुविधा पुरविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

कोल्हापूर महानगरपालिकेने स्वाधार नगर शेंडा पार्क या झोपडपट्टीमध्ये वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेअंतर्गत तसेच एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास प्रकल्पाअंतर्गत कायमस्वरुपी पक्की घरे बांधून देण्याची योजना केली होती परंतु झोपडपट्टी धारकांच्या अनास्थामुळे व प्रतिसाद न मिळाल्याने योजना कार्यान्वित होऊ शकली नाही.

तसेच इंदिरानगर झोपडपट्टी ही ई/वार्ड, सि.स.नं. ५१७ पैकी शिवाजी पार्क मधील ओपनस्पेस मध्ये वसलेली आहे व केंद्र शासनाच्या राजीव आवास योजनेअंतर्गत सदर झोपडपट्टीचे सामाजीक आर्थिक व उपजिविका सर्वेक्षण करणेत आलेले आहे. सद्यस्थितीत केंद्र शासनाच्या सर्वांसाठी घर (Housing For All) ही योजना जाहीर केलेली आहे. या योजनेअंतर्गत सद्या कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील सायन हॉस्पीटल मधील डॉक्टरांनी एका जखमी व्यक्तीला तो जिवंत असताना मृत घोषित करुन शवागरात पाठविल्याबबाबत

**(३८) ३१७७२ (२३-१२-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील सायन हॉस्पीटल मधील डॉक्टरांनी एका जखमी व्यक्तीला तो जिवंत असताना मृत घोषित करुन शवागरात पाठविल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक ११ ऑक्टोबर, २०१५ रोजी निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर व्यक्तीचे शव विच्छेदन करताना ती व्यक्ती जिवंत असल्याचे दिसून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने सबंधीत दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) शवागरात हलविण्यात आलेलया व्यक्तीच्या शरीराची हालचाल होत असल्याचे निदर्शनास आले होते हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी रुग्णालयातील तीन वरिष्ठ डॉक्टरांची चौकशी समिती गठीत करण्यात आली होती.

सदर रुग्णाची तपासणी करणारे सहायक वैद्यकीय अधिकारी डॉ रोहन रोहेकर यांनी दिलेल्या निवेदनावरुन व चौकशी अहवालानुसार सदर व्यक्ती सस्पेंडेड ॲनिमेशनमध्ये असल्याने त्या व्यक्तीमध्ये जिवंतपाणच्या कोणत्याही खुणा आढळून आल्या नव्हत्या. यास्तव त्यांना शवागरात हलविण्यात आले हेते. तथापि, तेथे त्याच्या शरीराची हालचाल होत असल्याचे निदर्शनास आल्याने त्याला तातडीने आपत्कालीन वैद्यकीय सेवा विभागात हलविण्यात आले.

तथापि, उपचारादरम्यान सदर व्यक्तीचा दिनांक १३.१०.२०१५ रोजी मृत्यु झाल्याने शवविच्छेदन करुन त्याचे अवयव पुढील तपसणीकरिता कलिनाच्या न्याय वैद्यकशास्त्र प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.

सदर रुग्णाची तपासणी करणारे डॉ.रोहन रोहेकर हे तदर्थ तत्वावर कार्यरत होते त्यांची सेवा महापालिकेमार्फत खंडीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे महानगरपालिकेचा मंजुर विकास आराखड्यानुसार पांचपाखाडी येथे बस आगारासाठी आरक्षित असलेला भूखंड ताब्यात घेण्याबाबत

**(३९) ३२२७१ (२१-०१-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेचा मंजुर विकास आराखड्यानुसार पांचपाखाडी येथे बस आगारासाठी आरक्षित असलेला भूखंड ताब्यात घेण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून योग्य प्रतिसाद मिळत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, पांचपाखाडी येथे बस आगारासाठी आरक्षित असलेला भूखंड ताब्यात घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :**(१), (२) व (३) ठाणे शहराच्या मंजूर विकास योजनेनुसार मौ.पांचपाखडी ठाणे येथील स नं. ३५५-अ या जमिनीवर आ.क्र. १ एस.टी. स्टॅण्डचे आरक्षण असून या आरक्षणाकरिता सुमचित प्राधिकरण महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ आहे. या आरक्षणावर संबंधित जमीनमालकांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७ ची सूचना महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, शासन  नगर विकास विभाग, संचालक नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे व ठाणे महानगरपालिकेस दि. ११/८/२०१४ रोजी दिली होती. सदर आरक्षणाकरिता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ हे समुचित प्राधिकरण असल्याने सदर आरक्षणाखालील जमिनीच्या संपादनाची कार्यवाही त्वरीत सुरु करणेसाठी संबंधितांना सुचना द्याव्यात असे शासन, नगर विकास विभागाने परिवहन विभाग टिप्पणीद्वारे कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज शहराच्या हद्द वाढीच्या प्रस्तावाबाबत**

**(४०) ३२५५४ (२१-०१-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज शहराचा हद्द वाढीचा प्रस्ताव माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त प्रस्तावावर महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ नुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हा-महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाने आरोग्य व वैयक्तिक अपघात विमा योजनेचा प्रिमियम (हप्ता) थकविल्याबाबत**

**(४१) ३२९२७ (१६-०१-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा-महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाने आरोग्य व वैयक्तिक अपघात विमा योजनेचा प्रिमियम (हप्ता) थकविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या योजनेअंतर्गत उपचार करणाऱ्या रुग्णालयांनी बांधकाम कामगारांवर उपचार करण्यास नकार दिला असल्याची तक्रार बांधकाम कामगार सेनेने केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगार लाभार्थींची संख्या विचारात घेता कामगार आयुक्त कार्यालयाने दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ ला ३७ कोटीवरुन २० कोटी रुपयांची तरतुद करण्याचा सुधारित प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविला असून शासनाने या प्रस्तावास पुढील एक वर्षासाठी मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीची वार्षिक मुदत संपली आहे त्यामुळे या योजनेमध्ये खंड पडण्याची भीती असून कामगारामध्ये असंतोष पसरुन चुकीचा संदेश जाऊ शकतो हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या योजनेबाबत कामगारांमध्ये वाढत चाललेला असंतोष लक्षात घेता या योजनेबाबत शासन स्तरावर निर्णय झाला आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२८-०७-२०१६) :**(१) नाही.

आरोग्य विमा दि.२१.०८.२०१४ रोजी काढण्यात आला होता व या पॉलिसीचा कालावधी दिनांक २०.०८.२०१५ रोजी संपुष्टात आला आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) व (५) मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांच्या आरोग्य विमा योजनेची मुदत संपुष्टात आली आहे. तथापि, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या "महात्मा फुले जन आरोग्य विमा योजना" अंतर्गत एक स्वतंत्र गट म्हणून बांधकाम कामगारांचा समोवश करुन त्यांना या योजनेचा लाभ देणे प्रस्तावित आहे.

---

**लांजा शहरातील (जि.रत्नागिरी) सदनिकांच्या सांडपाण्याचा निचरा होऊन विहिरींचे पाणी दूषित होत असल्याबाबत**

**(४२) ३३२६३ (२१-०१-२०१६). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा शहरातील (जि.रत्नागिरी) कांही सदनिकांच्या सांडपाण्याचा तसेच इतर सांडपाण्याचा निचरा होत नसल्यामुळे पाणी वस्तीच्या ठिकाणी आजुबाजूच्या परिसरातील जमिनीत मुरत असल्याने लगत असणाऱ्या विहिरींचे पाणी दुषित होत असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवासी संकुलासारख्या मोठमोठया इमारतीच्या बांधकामाची परवानगी देताना संबंधित यंत्रणेने सांडपाण्याचा प्रश्न निकाली न काढल्यामुळे सांडपाण्याचा निचरा होत नसल्याचे निदर्शनास आले आहे व त्यासंबंधीच्या तक्रारीदेखील वाढत चालल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१६) :**(१) व (२) अशा स्वरुपाच्या तक्रारी नगरपरिषदेकडे प्राप्त झाल्या आहेत.

(३) लांजा नगरपरिषदेने सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प राबविण्याबाबत संबंधित गृहसंकुलाकडून प्रतिज्ञापत्र घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अंबरनाथ नगरपालिकेच्या हद्दीतील डॉ.बी.जि.छाया रुग्णालयाबाबत

**(४३) ४१७३४ (१३-०५-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) नगरपालिकेच्या हद्दीतील डॉ.बी.जि. छाया रुग्णालय हे कंत्राटी डॉक्टरांना गत तीन महिन्यापासून पगार न दिल्याने तसेच अपुरा कर्मचारीवृंद, अपुऱ्या वैद्यकीय सुविधा या अनेक समस्यानी ग्रासले असून रुग्णालयातील रुग्णांचे अतोनात हाल होत असल्याचे माहे जानेवारी २०१६ व त्या दरम्यानच्या कालावधी मध्ये निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तद्नुसार शासनाने कोणती उपाययोजना केली आहे अथवा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१६) :**(१) होय, अंशत: खरे आहे.

माहे ऑक्टोबर ते माहे डिसेंबर २०१५ या कालावधीतील कंत्राटी डॉक्टरांचे मानधन देण्यास विलंब झाला हे खरे आहे. संपुर्ण खर्चाला दि.१८.०१.२०१६ रोजीच्या सर्वसाधारण सभेत मान्यता घेण्यात आली. सर्व कंत्राटी डॉक्टरांचे मानधन माहे जानेवारी, २०१६ मध्ये अदा करण्यात आले असून त्यानंतर सद्यस्थितीत कंत्राटी डॉक्टरांचा पगार प्रलंबित नाही.

तसेच नगरपरिषदेच्या दवाखान्यात कर्मचारी वृंद व वैद्यकिय सुविधा अपुऱ्या आहेत हे खरे आहे. तथापि, नगरपरिषद हद्दीलाच लागून असलेल्या उल्हासनगर शहरामध्ये शासनाचे मध्यवर्ती रुग्णालय (सेंट्रल हॉस्पिटल) आहे. त्यामुळे रुग्णांची प्रकृती गंभीर असल्यास अशा रुग्णांवर डॉ.बी.जी.छाया रुग्णालयात प्राथमिक उपचार करुन त्यांना पुढील औषधोपचारासाठी उल्हासनगर मधील मध्यवर्ती रुग्णालयात पाठविण्यात येते. त्यामुळे रुग्णालयातील रुग्णांचे अतोनात हाल होत असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(२) नगरपरिषदेचे डॉ.बी.जी. छाया रग्णालय शासनाच्या ताब्यात घेण्याचा प्रस्ताव, शासनाच्या विचाराधीन आहे.

याशिवाय तो पर्यंतची पर्यायी व्यवस्था म्हणून सदर प्रकरणी नगरपरिषदेने खालील प्रमाणे वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांचे सेवा कंत्राटी पध्दतीने घेतलेल्या आहेत.

| | |
|---|---|
| एम.बी.बी.एस | - ०३ |
| बी.ए.एम.एस. वैद्यकिय अधिकारी | - ०५ |
| जी.एन.एम. स्टाफ नर्स | - ०४ |
| ए.एन.एम. | - ०७ |
| लॅब टेक्नीशियन | - ०१ |
| फर्माशिस्ट | - ०२ |

या व्यतिरिक्त खालीलप्रमाणे स्थायी कर्मचारी वर्ग नगरपरिषद रुग्णालयात कार्यरत आहे.

| | |
|---|---|
| एम.बी.बी.एस | - ०३ |
| जी.एन.एम.स्टाफ नर्स | - ०५ |
| ए.एन.एम. | - ०५ |
| लॅब टेक्नीशियन | - ०१ |
| फर्माशिस्ट | - ०१ |
| एक्स - रे टेक्निशीयन | - ०१ |
| ओ.टी.एटेंडंट | - ०१ |

सबब, सद्य:स्थितीत नगरपरिषदेच्या दवाखान्यात आवश्यकते एवढा कम्रचारी वर्ग उपलब्ध आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील पूर्व आणि पश्चिम उपनगरांना जोडणारा गोरेगाव-मुलुंड लिंक रोड प्रकल्पाबाबत

**(४४) ४२४५९ (०७-०५-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पूर्व आणि पश्चिम उपनगरांना जोडणारा गोरेगाव-मुलुंड लिंक रोड प्रकल्प शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून बोगदा प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्प पुर्णत्वास नेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१६) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून प्रस्तावित भुयारी मार्गाचे अंतिम स्वरुप निश्चित करण्याकरिता भूस्तर चाचणी व भूसर्वेक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे. त्याकरिता वन विभागाची परवानगी मिळविण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दि.१०.०३.२०१६ रोजी संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांच्याकडे विहित नमुन्यामध्ये आवेदन सादर करण्यात आले आहे.

वन विभागाकडे सदर प्रस्ताव विचाराधीन असून आवश्यक ती मंजुरी प्राप्त झाल्यानंतर महापालिकेमाफेत पुढील कार्यवाही प्राधान्याने करण्यात येईल.

---

**मुंबईतील २६ महानगरपालिका शाळांच्या पुनर्विकासासाठी**
**डीसीआरच्या नियमांमध्ये बदल करण्याबाबत**

**(४५) ४२८५७ (०३-०५-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील २६ महानगरपालिका शाळांचा पुनर्विकास होणे गरजेचे असून या शाळापैंकी १५ शाळा या धोकादायक स्थितीत असल्यामुळे या २६ शाळांच्या पुनर्विकासासाठी महानगरपालिकेने डीसीआर नियमामध्ये बदल करावा अशी लोकप्रतिनिधींनी मागणी केली असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शाळांच्या पुनर्विकासासाठी डीसीआरच्या नियमांमध्ये बदल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१६) :**(१) प्रस्तुत प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २९.१०.२०१५ रोजीचे पत्रान्वये १४ शाळांच्या पुनर्बांधणी व १४ नवीन शाळांच्या बांधकामाच्या संदर्भात शासनाचे ४०% किमान क्षेत्र क्रिडांगणासाठी एका ठिकाणी राखीव ठेवणेबाबतचे दिनांक २४.२.२०१४ रोजीचे निदेश आहेत त्यामध्ये शिथिलता अपेक्षिलेली आहे.
(२) व (३) शाळांसाठी क्रिडांगणाचे क्षेत्र नियोजिणे आवश्यक आहे. सरसकट महानगरपालिकांच्या शाळांना अशी सवलत दिल्यास खाजगी शाळांच्या संदर्भातही अशी मागणी होवू शकते.

शासनाच्या दिनांक २१.०२.२०१४ रोजीच्या निदेशामध्ये विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात विद्यमान शैक्षणिक इमारतीचे विस्तार करणे अगत्याचे असेल तर अशा अपवादात्मक परिस्थितीत भूखंडामधील मोकळी जागा कमी करण्यासाठी शासनाची पूर्व मान्यता घेवून शैक्षणिक इमारतीच्या बांधकामासाठी अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करता येईल अशी तरतूद आहे. त्यामुळे महानगरपालिकेकडून प्रकरणनिहाय प्रस्ताव प्राप्त झालेस त्याबाबत शासनाकडून उचित कार्यवाही होवू शकेल.

---

**मुंबईतील विद्यार्थ्यांच्या मासिक व त्रैमासिक पासाचे दर कमी करण्याबाबत**

**(४६) ४२८९४ (१७-०५-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विद्यार्थ्यांच्या मासिक व त्रैमासिक पासाचे दर कमी करण्याबाबत बेस्ट प्रशासनाला मा.अर्थमंत्री यांनी सूचना केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सूचनेनुसार शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) सदर सूचनेनुसार बेस्ट उपक्रमाने दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ पासून मुंबईतील विद्यार्थ्यांच्या मासिक व त्रैमासिक बसपास दरात कपात केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुबंई दहिसर येथील मैदानासाठी आरक्षित असलेला भूखंड**
**शासनाने वर्षभरात ताब्यात न घेतल्याबाबत**

**(४७) ४३६२३ (१७-०५-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुबंई दहिसर येथील मैदानासाठी आरक्षित असलेला भूखंड शासनाने वर्षभरात ताब्यात घेतला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१६)** :(१) ते (४) प्रस्तुत प्रकरणी दहिसर (मुंबई) येथे मैदानासाठी एकूण ६७ आरक्षणे आहेत. त्यापैकी २८ आरक्षणे महानगरपालिकेच्या मालकीची असून ती महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. यासंदर्भात मैदानासाठी आरक्षित असलेल्या प्रश्नाधीन भूखंडाबाबत तपशील दिलेला नसल्याने याबाबत निश्चित माहिती देणे शक्य होत नाही.

---

**मुंबईमध्ये प्रतिदिन १०० दशलक्ष लिटर समुद्राच्या पाण्याचे नि:क्षारीकरण करण्याचा प्रकल्प रद्द करण्याच्या निर्णयाबाबत**

**(४८) ४५०९० (०३-०५-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये प्रतिदिन १०० दशलक्ष लिटर समुद्राच्या पाण्याचे नि:क्षारीकरण करण्याचा प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प रद्द करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकल्पासंदर्भातील अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, त्या अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे,
(४) तसेच उक्त प्रकल्पासाठी किती खर्च अपेक्षित होता ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१६)** :(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नि:क्षारीकरणाचा प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(२) खालील सर्व बाबींचा विचार करता नि:क्षारीकरण प्रकल्प व्यवहार्य ठरत नसल्यामुळे महानगरपालिकेने सदर प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे :-

मुंबईत जागेची उपलब्धता
प्रकल्प उभारणीचा अवाढव्य खर्च (१०० द.ल.लि. साठी सुमारे रु.१००० कोटी)
प्रकल्प चालविण्यासाठी लागणारा जास्त व अखंड वीज पुरवठा
मुंबईपासून १०० ते १५० कि.मी. परिसरात उपलब्ध नदी स्त्रोत

(३) सदर प्रकल्पासंदर्भातील अहवाल बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेला नाही.
(४) सदर प्रकल्प उभारणीचा अंदाजित खर्च १०० द.ल.लि. साठी सुमारे रु.१००० कोटी एवढा अपेक्षित होता.

---

**कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील कल्याण पूर्वतील पुना लिंक रोडवर काटेमानिवली नाक्याच्या आधी "ड" प्रभाग क्षेत्र कार्यालया समोरील टेकडी मुळे रस्त्याची उंची कमी करण्याबाबत**

**(४९) ४५७६७ (०५-०५-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील कल्याण पुर्व भागातील पुना लिंक रोडवर काटेमानिवली नाक्याच्या आधी "ड" प्रभाग क्षेत्र कार्यालया समोरील टेकडी मुळे रस्त्याची उंची जास्त झाली असून रस्त्याची उंची व तीव्र उतारामुळे तेथे वाहनांचे अनेकदा अपघात घडून येतात त्यामुळे रस्त्यांची उंची कमी करुन उतार कमी करण्यात यावा याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, कल्याण-डोंबिवली महापालिका यांना दिनांक २५ एप्रिल, २०१३ पासून ते आज रोजी पर्यंत २ स्मरण पत्र दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण पुर्व येथील पुणे लिंक रस्ता सूचक नाका ते चक्की नाका ते श्रीराम चौक या रस्त्याच्य कामाकरीता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत मे.ध्रुव कन्सल्टंसी सर्व्हेसेस प्रा.लि. मुंबई या अभिकरणाची महानगरपालिकेकडून समंत्रक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या समंत्रकाकडून सदर रस्त्याचे सवेक्षण करण्यात आले असून त्याबाबतचा अहवाल महानगरपालिकेस सादर करण्यात आला आहे. या अहवालानुसार पुढील कार्यवाही प्रस्तावित असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील भोसला मिलीटरी स्कुल जवळील संत कबीर नगर झोपडपट्टी स्थलांतरीत करणेबाबत**

**(५०) ४७३८९ (१६-०५-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील भोसला मिलीटरी स्कुल जवळील संत कबीर नगर झोपडपट्टी स्थलांतरीत करुन या झोपडपटटी वासियांना जवाहरलाल नेहरु पुनरूत्थान योजने अंतर्गत घरकुलाचा लाभ देण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २६.१२.२०१४ रोजी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०९-०८-२०१६) :**(१) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.१२.१.२०१५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांना निवेदन दिले आहे. केंद्र शासन पुरस्कृत बीएसयुपी योजनेअंतर्गत नाशिक महानगरपालिकेमध्ये सन २००७ मध्ये मे. ओंकार असोसिएट्स पुणे यांनी १६८ झोपडपट्ट्यांचे सर्व्हेक्षण केलेले असून त्यापैकी ११२ झोपडपट्ट्या अघोषित व ५६ झोपडपट्ट्या घोषित आहे. संत कबीर नगर ही झोपडपट्टी नाशिक मनपाच्या सातपूर भागात येत असून सदर झोपडपटटीचे क्षेत्रफळ ३८५८९.७४ चौ.मी. इतके आहे. सदर जमिन खाजगी मालकीची असून सन २००७ च्या सर्व्हेक्षणानुसार या भागात एकूण ७६७ झोपडीधारक आहेत. नाशिक महानगरपालिका हद्दीत गृहनिर्माण विभाग क्र. जनेयो.२००७/प्र.क्र.५२/गृनिधो-२, दि.२५.६.२००७ च्या शासन निर्णयानुसार बीएसयुपी योजना सुरु आहे. सदर योजना नाशिक महानगरपालिका हद्दीतील शासकीय व मनपाच्या भुखंडावर वास्तव्यास असलेल्या झोपडपट्टी -वासियांसाठी आहे. संत कबीर नगर या जागेची मालकी खाजगी असल्याने सदर झोपडपट्टीवासियांचा समावेश बीएसयुपी योजनेमध्ये करण्यात आलेला नाही. यासंदर्भात नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दि.२.११.२०१५ रोजी पत्राद्वारे कळविले आहे.

(२) व (३) प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्ट्यांचे सर्व्हेक्षण व मागणी सर्व्हेक्षण करण्यात येणार असून सर्व्हेक्षण झाल्यावर निकषाप्रमाणे पात्रता धारण करणाऱ्या लाभार्थ्यांना या योजनेत सामावून घेण्यात येईल.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.